


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १६०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२२ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## सूर्या दादा आला अन भारताने पहिला सामना जिंकला!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नागपूर :** भारताला दोन वनडे सामन्यांत सलग पराभव पत्करावे लागले होते. पण यावेळी भारताचा कर्णधार बदलला आणि संघाचे नशिबही बदलल्याचे पाहायला मिळाले. कारण भारताने पहिल्याच टी २० सामन्यात न्यूझीलंडवर दम दार विजय साकारला. अभिषेक शर्माने धडाकेबाज ८४ धावांची खेळी साकारत संघाला दणकेबाज सुरुवात करून दिली. अभिषेक बाद झाल्यावर रिंकू सिंग नावाचे वादळ मैदानात घोंगावले. रिंकूने अखेरच्या षटकात तुफानी फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या तोंडचे पाणी पळवले. त्यामुळेच भारताला या सामन्यात २३८ धावांचा डोंगर उभारता आला. या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला चांगलाच घाम फुटला आणि त्यामुळे भारताला या सामन्यात ४८ धावांनी मोठा विजय साकारता



आला. भारताला टॉस जिंकता आला नाही आणि त्यांची सुरुवातही चांगली झाली नाही. सलामीवीर संजू सॅमसन आणि इशान किशन लवकर बाद झाले. त्यामुळे भारताची २ बाद २७ अशी अवस्था झाली होती. त्यावेळी अभिषेक शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी संघाला सावरले. अभिषेक शर्माने तर न्यूझीलंडची दाणादाणच उडवली. कारण अभिषेकने फक्त २२ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. अभिषेक अर्धशतक साकारल्यावर शतकाच्या दिशेने कूच करायला लागला. अभिषेक यावेळी अशी फलंदाजी करत होत की, तो शतक पूर्ण करेल, असे वाटत होते. पण अभिषेकला यावेळी शतक पूर्ण करता आले नाही. पण अभिषेकने यावेळी फक्त ३५ चेंडूंत ८४ धावांची धम किदार खेळी साकारली. अभिषेक बाद झाल्यावर भारताची धावगती कमी होईल, असे वाटत होते. पण तसे घडले नाही.

अभिषेक बाद झाल्यावर रिंकू सिंगने न्यूझीलंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. कारण रिंकूने अखेरच्या षटकात धडाकेबाज फटकेबाजी केली आणि त्याच्यामुळेच भारताला २३८ धावांचा डोंगर उभारता आला. कारण रिंकूने या सामन्यात फक्त २० चेंडूंत नाबाद ४४ धावांची खेळी साकारली.

भारताने जेव्हा २३८ धावा केल्या तेव्हाच त्यांचा विजय जवळपास निश्चित झाला होता. पण अर्शदीप सिंगने पहिल्याच षटकात न्यूझीलंडला धक्का दिला. त्यानंतर भारताने ठराविक फरकाने न्यूझीलंडच्या फलंदाजांना बाद केले आणि पहिल्या सामन्यात सहज विजय मिळवला.

## नागपूरमध्ये भरदिवसा तरुणीची निर्घृण हत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नागपूर :** नागपूरच्या मानकापूर परिसरात दिवसाढवळ्या तरुणीची निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. गोधनी येथील कलेक्टर कॉलनीमधील राजलक्ष्मी सोसायटीत राहणाऱ्या २३ वर्षीय प्राची खापेकर हिचा मृतदेह तिच्याच घरात आढळून आला आहे. सुरुवातीला या घटनेची नोंद आत्म हत्येच्या संशयावर करण्यात आली होती. मात्र शवविच्छेदन अहवालात प्राचीच्या डोक्यावर गंभीर जखमा तसेच गळ्यावर लिगेचर खुणा आढळल्याने हा प्रकार थंड डोक्याने आखलेला खून असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**जड वस्तूने डोक्यावर वार करून हत्या करण्यात आल्याची माहिती**

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, अज्ञात आरोपीने दिवसाच्या वेळी घरात घुसखोरी करून प्राचीवर हल्ला केला. धारदार अथवा



जड वस्तूने डोक्यावर वार करून तिची हत्या करण्यात आली आणि नंतर दुपट्ट्याच्या सहाय्याने मृतदेह पंख्याला लटकवून आत्महत्येचा बनाव करण्यात आला. वारदातीनंतर आरोपी मागील बाजूने फरार झाल्याचा अंदाज आहे. म ानकापूर पोलिसांनी मृतकाच्या आईच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# अहिल्यानगर पोलिसांनी जप्त केलेले ड्रग्ज शिरूरमध्ये, ‘स्थानिक’च्या प्रतापानं गृहखातं हादरलं !

### अहिल्यानगरमधील पोलिस कर्मचाऱ्याला पुणे ग्रामीण पोलीसांनी घेतले ताब्यात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्याच्या गृहखात्याचा कारभाराचे वाभाडे, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या कारभाराने निघाली आहेत. शिरूर इथं गाजत असलेल्या दोन कोटी रुपयांच्या एम डी ड्रग्ज प्रकरणाची पाळेमुळे अहिल्यानगर पोलिस दलापर्यंत येऊन पोहोचलीत.

पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी या ड्रग्ज प्रकरणात, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी श्यामसुंदर गुजर (वय ३९, रा. नेप्ती, ता. नगर) याला अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे गृहखात्यात खळबळ उडाली आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरूरमध्ये दोन कोटी रुपयांचं एमडी ड्रग्जचं प्रकरण गाजत आहे. पुणे ग्रामीण स्थानिक शाखा पोलिसांनी याचा शोध घेतल्यानंतर, याचे पाळेमुळे अहिल्यानगरपर्यंत येऊन पोहोचली. अहिल्यानगर पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी श्यामसुंदर गुजर हा एमडी ड्रग्ज पुरवत होता, याची माहिती समोर आली. पुणे ग्रामीण पोलिसांनी त्याला काल सायंकाळी अहिल्यानगर पोलिस अधीक्षक कार्यालयातील स्थानिक गुन्हे शाखेतून ताब्यात घेत अटक केली.

पुणे पोलिसांच्या चौकशीत, श्यामसुंदर गुजर हा पोलिसांनी जप्त केलेल्या ड्रग्जम धून मुद्देमाल काढून बाहेर विकत होता, असे समोर आलं आहे. यानंतर पुणे अन् अहिल्यानगर पोलिसांनी श्यामसुंदर गुजर याच्या प्रतापाची चौकशी केली. या प्राथमि क चौकशीत, तो अहिल्यानगर पोलिसांनी जप्त केलेल्या ड्रग्जमधून मुद्देमाल चोरून काढून बाहेर विकत असल्याचं समोर आलं.

पोलीस कर्मचारी शामसुंदर गुजर हा स्थानिक गुन्हे शाखेत नार्को टेस्टसाठी काम करायचा. अहिल्यानगर जिल्ह्यात जप्त केलेले ड्रग्ज, अंमली पदार्थांचा मुद्देमाल कक्ष त्याच्या ताब्यात होता. यासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयात स्वतंत्र मुद्देमाल कक्ष आहे. या कक्षाची चावी मुख्यालयात जमा असते. हि चावी त्याच्याकडे असायची. तसेच, या विभागाचा सर्व पत्रव्यवहार देखील तोच संभाळत होता. एवढ्या म ोठ्या प्रकारामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचे संकेत अहिल्यानगर पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**श्रीरामपूरमधील ड्रग्ज प्रकरण पुन्हा चर्चेत...**

अहिल्यानगरमधील श्रीरामपूर अन् संगमनेरमध्ये मध्यंतरी ड्रग्जचे प्रकरण चांगलेच गाजत होते. श्रीरामपूरमधील एमआयडीसीतील एका गोदामातून पोलिसांनी १४ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. या ड्रग्ज प्रकरणाचे पुढे धागेदोरे तेलंगणा पर्यंत निघाली. हे जप्त केलेले ड्रग्ज देखील स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात होते.

- पुणे जिल्ह्यातील शिरूर परिसरातील बाबूरावनगर भागात शनिवारी (दि.१७) मध्यरात्री शादाब रियाज शेख (वय ४१) हा संशयास्पद फिरत असताना, पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केल्यावर त्याच्या बॅगमधून सुमारे २ कोटी १० लाख रुपयांचे १ किलो ५२ ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्ज सापडले. पुणे ग्रामीण पोलिसांनी शादाब रियाज शेख याच्याकडे केलेल्या चौकशीनंतर अहिल्यानग पोलिस दलातील शामसुंदर गुजर याचे नाव समोर आलं. यानंतर पुणे ग्रामीण अधिक्षक कार्यालयात येत, शामसुंदर गुजर याला ताब्यात घेतले. चौकशीनंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

- काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी नगर पोलीस दल, स्थानिक गुन्हे शाखा पोलीसांच्या हप्ते खोरी व भ्रष्ट कारभारविरोधात आंदोलन केले होते. या आंदोलनावेळी त्यांनी अहमदनगर जिल्हा पोलिस दलाचे स्थानिक गुन्हे शाखा पोलिस अहिल्यानगर जिल्ह्यातून दरमहा २७ कोटी ६९ लाख रुपयांचा हप्ते वसूल करत असल्याची धक्कादायक माहिती खासदार निलेश लंके यांनी जाहीर केली होती. अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलाच्या कारभारविरोधात बेमुदत उपोषणामुळे चर्चेत आले होते. आजा थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजणाऱ्या ड्रग्ज तस्करीच्या गुन्ह्यात पोलिसाचा सहभाग आढळल्याने नागरिकांमधून संतप्त सवाल विचारले जात आहेत. तरुण पिढीला बरबाद करणाऱ्या या विषारी विळख्यात जर पोलिसच सामिल असतील तर न्याय कुणाकडे मागायचा ? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

## बेलापूर विभागात अनधिकृत झोपडपट्ट्यांवर निष्कासनाची कारवाई




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्दे शानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

करावे गांव सेक्टर –३८ प्लॉट नंबर १५८ च्या समोर नवी मुंबई महानगरपालिकेच्या उदयानासाठी राखीव असलेल्या भुखंडावर अतिक्रमण करुन साधारणत: २९ कच्च्या खोल्यांचे बांधकाम केले होते. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. सदर अनधिकृत बांधकाम हटविले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत दि.२१/०१/२०२६ रोजी तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, प्रशांत नेरकर, सहा. अभियंता आत्माराम काळे व विभागाती इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेसाठी मजूर–१०, जेसीबी–०१ इत्यादी मनुष्यबळ व साधनसामुग्री वापरण्यात आली. तसेच अतिक्रमण विभागातील पोलिस अधिकारी/ कर्मचारी व सुरक्षारक्षक उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## मुंबईत ठाकरेंची पहिली नगरसेविका फुटली ?



**दि.२१, मुंबई :** महापालिका निवडणुकांचे निकाल लागताच राज्यात पुन्हा विजयी उमेदवारांची पळवापळवी सुरू झाली आहे. मुंबईसह उपनगरातील महापालिकांमध्ये नगरसेवकांना फोडण्याचा प्रयत्न होत असून ठाकरेंचे ४ ते ५ नगरसेवक फुटल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामध्ये, केडीएमसी महापालिकेत ४ आणि मुंबईतील १ नगरसेविका फुटल्याबाबत वृत्त येत आहे. मात्र, मुंबईतील वार्ड क्रमांक १५७ मधील ठाकरेंच्या नगरसेवक सरिता म्हस्के आमच्या संपर्कात आहेत, त्यांच्या कौटुंबिक कारणास्तव त्या येऊ शकल्या नाहीत. मात्र, त्यांना एक महिन्यांचा अवधी असून त्यांच्यावर कारवाईची कुठलीही वेळ येणार नाही, अशी माहिती शिवसेना नेते अनिल परब यांनी दिली. मुंबईतील नगरसेविका डॉ.सरिता म्हस्के यांच्या फ ुटीसंदर्भातही अनिल परब यांनी भूमिका मांडली. नगरसेविका सरिता म्हस्के आमच्या संपर्कात आहेत, त्या कुठेही गेलेल्या नाहीत. त्यांनी त्यांचे कौटुंबिक कारण सांगितले आहे. पुढील १ महिन्यापर्यंत कोकण विभागीय आयुक्तांकडे नोंदणी करण्यासाठी कायदेशीर वेळ आहे. त्यामुळे, डॉ. सरिता म्हस्के यांची नोंदणी होईल. म्हस्के यांनी दिलेले कारण आम्ही कोकण विभागीय आयुक्तांना सांगितले आहे, अशी माहिती अनिल परब यांनी दिली. पुढील १ महिना त्या न आल्यास काय कारवाई करायची याबाबत पक्षश्रेष्ठीच ठरवतील, पण ती वेळ येणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

## बिहार भवन प्रस्तावाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचा तीव्र निषेध

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२१, घाटकोपर :** महाराष्ट्रात बिहार भवन उभारण्याच्या प्रस्तावा विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने घाटकोपर परिसरात बॅनर झळकवत तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

बिहार भवन बांधल्यास त्याची अवस्था अशी करण्यात येईल, असा आक्षेपार्ह मजकूर व चित्र असलेले बॅनर लावण्यात आले होते. पहाटेच्या सुमारास घाटकोपर पोलिसांनी हे बॅनर काढून टाकले.

बिहार भवनाच्या प्रस्तावाला म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कडाडून विरोध दर्शविला आहे. मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी यासंदर्भात आपली अधिकृत प्रतिक्रिया देताना, जोपर्यंत मनसे अस्तित्वात आहे, तोपर्यंत महाराष्ट्रात बिहार भवन उभारू देणार नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. त्यानंतर मनविसेच्या वतीने घाटकोपरम ध्ये बॅनरबाजी करण्यात आली.




या बॅनरवरील मजकूर व चित्रांम धून बिहार भवन उभारल्यास त्याची तोडफोड करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला असल्याचे मनविसेचे सचिव ॲड.अभिषेक सावंत यांनी सांगितले. प्रतिक्रिया देताना त्यांनी म्हटले की, मुंबई आधीच परप्रांतीयांचा मोठा भार झेलत आहे. अशा परिस्थितीत बिहारमधील नागरिकांसाठी स्वतंत्र भवन उभारण्याचा प्रस्ताव म ांडला जात आहे.

त्याऐवजी हा निधी बिहार राज्यातील विकासकामांसाठी खर्च करावा. बिहार भवन उभारल्यास मनसे तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही मनविसेने बॅनरच्या माध्यमातून दिला असल्याचे ॲड.सावंत यांनी स्पष्ट केले.

# एकनाथ शिंदे-अजित दादा यांची अस्तित्वाची लढाई...?



महापालिकांचा धुराळा खाली बसत नाही तोच आता झेडपी, पंचायत समितीचे नगारे वाजायला लागले. महापालिका निवडणुकीत मुंबईत एकनाथ शिंदे भाजपसोबत सत्तेत असतील, ठाण्यात कदाचित त्यांचा महापौरही असेल. तसा शब्द मुख्यमंत्री फडणवीसांनी त्यांना दिला आहे. अजित पवारांनी महिनाभर पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये मुक्काम ठोकला, पण त्यांना दोन्ही शहरांपैकी कुठेही थारा मिळाला नाही. काकांना सोबत घेऊनही राज्यात एकही महापालिका राष्ट्रवादीला ताब्यात घेता आली नाही. राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री सत्तेत राहून सत्तेबाहेर फेकले गेले. शहरांच्या राजकारणातून, सत्ताकारणातून, अर्थकारणातून काही प्रमाणात ते हद्दपार झाले आहेत. महापालिकांमधील सत्तेची लढाईच मुळात विकासाच्या नावाखाली राबवल्या जाणाऱ्या योजनातील लाभार्थी होण्यासाठीची असते. अजित पवारांना या लढाईत सपशेल अपयश आले आहे, तर एकनाथ शिंदेंना 'डुबते को तिनके का सहारा' एवढेच यश मिळाले. मुंबई महापालिकेत उपमहापौरपदावर समाधान मानावे लागेल एवढा सन्मानजनक तोडगा त्यांच्या चार दिवसांपासूनच्या हॉटेल पॉलिटिक्सवर निघण्याची शक्यता आहे. पण खरे काळजीचे कारण वेगळेच आहे.

एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत शिवसेनेचे ४० आमदार फोडले होते. त्याला साडेतीन वर्षे झाली. तेव्हापासून पक्ष, चिन्हाचा वाद सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. शिंदेंनंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडून सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने राष्ट्रवादीमध्येही फूट पडली होती. एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांनी दुसऱ्याने स्थापन केलेल्या पक्षावर दावा केला. निवडणूक आयोग, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी खरा पक्ष आणि निवडणूक चिन्ह तुमचेच आहे, असा निकाल दिला. चिन्ह आणि पक्षाचा हा वाद सर्वोच्च न्यायालयात असून त्यावर आज २१ जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीत काय होणार याकडे एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांचे लक्ष लागले आहे. आता झेडपी, पंचायत समिती निवडणूक झाल्यानंतर राज्यात



कव्हर स्टोरी

- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

२०२९ पर्यंत कोणतीही मोठी निवडणूक नाही. अशा वेळेत शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर निवाडा होणार आहे, निर्णय दिला जाणार आहे. या वादावरील ही अंतिम सुनावणी असणार आहे. साडेतीन, चार वर्षांपासून सुरू असलेल्या सुनावणीत जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह आणि शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई

महापालिकेत ते कोणत्या नावाने बसणार ? महापालिकेत आधीच किंचित झालेला पक्ष नावाशिवाय तरणार कसा? शिवसेना या नावाभोवतीच्या वलयातून बाहेर पडून एकनाथ शिंदेंचे अस्तित्व नेमके काय असेल ? मुंबईतून ठाकरे संपवल्याशिवाय भाजपला राज्यात आणि मुंबईत एकहाती सत्ता मिळणार नाही. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका ताब्यात घेता येणार नाही, राज्यात सत्तेचा सोपान चढता येणार नाही. याची पूर्ण जाणीव झाल्यानंतरच शिवसेनेच्या बंडखोरीची पटकथा लिहिली गेली होती. विधानसभेत यात काही प्रमाणात यश आले, पण मुंबई महापालिकेत ८२ वरून फक्त ७ जागांचीच मजल गाठता आली. भाजपला मुंबईत मिळालेल्या ८९ जागांच्या आनंदापेक्षा ठाकरे बंधूंनी मिळवलेल्या ७१ जागांचे दुःख जास्त आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीसांनी निकाल जाहीर झाल्यानंतर वसंत स्मृतीला जाणे टाळत महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात जाणे पसंत केले. त्यानंतर त्यांनी थेट नागपूर गाठले. यथावकाश मुंबई कार्यालयात त्यांनी पायधूळ झाडली, पण तेव्हाही त्यांचा रोख ठाकरेंवरच अधिक होता. शिंदेंकडून भाजपला मुंबई महापालिकेत पाहिजे तशी मदत झाली नाही. या उलट शिंदेंचे पराभूत उमेदवार आता भाजपवर खापर फोडत आहेत. भाजपच्या टोळीने शिंदेंचे उमेदवार पाडले असा थेट आरोप केला जात आहे. दुसरीकडे अजित पवार हे स्वतःच्या काकांविरोधात बंडखोरी करून सत्तेसोबत गेले त्याच काकांना, त्यांच्या पक्षाला सोबत घेऊन त्यांना महापालिका लढावी लागली. उद्याच्या झेडपीचे इलेक्शन काका, पुतणे घड्याळ चिन्हावरच लढले तर नवल वाटायला नको. या सर्व पार्श्वभूमीवर आज सुरू होणारी पक्ष आणि चिन्हाच्या निकालाची सुनावणी महत्त्वाची ठरणार आहे. खटला बोर्डवर आलाच आणि सुनावणी झालीच आणि पक्ष चिन्ह गेले तर शिंदेसेनेतील नेत्यांना स्वगृही परतावे लागेल. एकनाथ शिंदेंसाठी परतीचे दोर कापले गेलेले आहे. त्यांना त्यांचा पक्ष भाजपमध्ये विलीन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. आज २९ नगरसेवक असूनही ते महापौरपदासाठी भांडू शकत आहेत, ते विलीनीकरणानंतर करू शकणार नाहीत. एकदा मांडलिकत्व पत्करल्यानंतर त्यांचे अस्तित्व हे परप्रेरित होण्याचीच शक्यता काँग्रेसने अधिक आहे. या उलट राष्ट्रवादी काँग्रे एकत्रिकरणाची चर्चा महापालिका निवडणुकीपासूनच सुरू केली. आता तर एकाच चिन्हावर लढण्यापर्यंत नेत्यांचे एकमत होऊ लागले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी ही कालही वेगळी नव्हती आणि उद्याही वेगळी नसेल, असे जे आरोप होत होते, त्यावर काका-पुतणे एकत्र येऊन शिक्कामोर्तबच करतील.

## ७२व्या महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा संघ जाहीर

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२१, मुंबई :** ७२व्या महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचा संघ आज राज्य संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तीकर यांच्या मान्यतेने व मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आला. संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे हे निवडणूक कार्यात व्यस्त असल्याने गजानन कीर्तीकर यांना यात लक्ष घालावे लागले. पुणे ग्रामीणच्या रेखा सावंतकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा, तर मुंबई उपनगर पश्चिमच्या कोमल देवकर कडे सहाय्यक नेतृत्व सोपविण्यात आले.तेलंगणा येथील गच्ची बोवली बंदिस्त क्रीडा संकुल येथे २७ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत ही स्पर्धा होईल.

मुंबई उपनगर कबड्डी असो. व स्वस्तिक क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली पूर्व येथील सुवर्णा संतोष केणे गार्डन, आयरे रोड येथे या संघाचे सराव शिबिर प्रशिक्षिका मेघाली सचिन म्हसकर (कोरगावकर) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या संघासोबत फिजिओ म्हणून सलोनी संकपाळ यांची, तर फिटनेस ट्रेनर म्हणून सायली नागवेकर हिची नियुक्ती करण्यात आली आहे.



या संघाच्या निवडीत पारदर्शकता यावी म्हणून या निवडीचे थेट प्रक्षेपण करण्यात येऊन ते कबड्डी रसिकांना दाखविण्यात आले. मीनल पालांडे, वीणा शेलटकर, मेघाली कोरगावकर यांच्या निवड समितीने या संघाची निवड केली. या तिन्ही सदस्य शिवछत्रपती पुरस्कार खेळाडू आहेत. हा संघ दिनांक २६ जानेवारी रोजी पहाटे तपोवन एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना होईल.

**निवडण्यात आलेला संघ खालील प्रमाणे.**

१) रेखा सावंत(संघनायिका)पुणे ग्रामीण, २)कोमल देवकर(उपसंघनायिका), मुंबई उपनगर पश्चिम, ३) प्रतीक्षा तांडेल, मुंबई शहर पश्चिम, ४) समृद्धी मोहिते, मुंबई उपनगर पूर्व, ५)पौर्णिमा जेधे, मुंबई शहर पूर्व, ६) ज्युली मिस्किटा, पालघर, ७)साक्षी सावंत, मुंबई शहर पूर्व, ८) समरिन बुरोंडकर, रत्नागिरी, ९)गार्गी साखरे, सातारा १०)आम्रपाली गलांडे, पुणे शहर, ११)निकिता पडवळ, पुणे ग्रामीण १२) याशिका पुजारी, मुंबई उपनगर पूर्व, १३) माधुरी गवंडी, ठाणे शहर, १४) संजना भोईर, पालघर.

**राखीव खेळाडू :-** १)हर्षा शेट्टी, पुणे शहर, २) तसलिन बुरोंडकर, रत्नागिरी, ३)अंकिता चव्हाण, पुणे शहर.

**प्रशिक्षिका :-** मेघाली सचिन म्हसकर.

**रेखा सावंत :-** संघनायिका

## दावोसच्या परिषदेतील पहिल्या दिवसातच साडे चौदा लाख कोटीचे करार

दावोस परिषदेच्या उधोग करारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ गेले आहे. तेथील परिषदेत पहिल्याच दिवशी सुमारे साडे चौदा लाख कोटींचे करार करण्यात आले. या करारामुळे महाराष्ट्रातील उधोगाना चालना मिळणार असून सुमारे १५ लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. भारतातील उधोग गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राचे गेट वे ऑफ इंडिया असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी क्षेत्र, जहाज बांधणी, अशा विविध क्षेत्रात ही गुंतवणूक आहे ही गुंतवणूक प्रामुख्याने मुंबई, रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात होणार आहे. विशेषतः गडचिरोली सारख्या भागात गुंतवणूक होणार असल्यामुळे तेथे विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे तेथील उधोग वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे जगभरातल्या सर्वच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील गुंतवणुकीला प्राधान्य दिले आहे. आता या पुढील काळ कसोटीचा आहे. येणाऱ्या उधोगाना आवश्यक सुविधा व वेळेवर व दर्जेदार पद्धतीने मिळाल्या पाहिजेत.मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबतीत काळजी घेतली जाईल असे सांगितले आहे. एकूणच महाराष्ट्राच्या रोजगार निर्मितीमध्ये या उधोगांचा मोठा वाटा असणार आहे. महाराष्ट्राचे विकास स्वप्न मुख्यमंत्री साकार करत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. देशातील प्रथम क्रमांकावरचे महाराष्ट्र राज्य विकासाच्या बाबतीत घोडदौड करत आहे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

## विकासाची नवी लाइन






राज्यात गेले काही दिवस महापालिका निवडणुकांची धामधूम सुरू असल्याने इतर काही महत्त्वाच्या घटना-घडामोडींकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही किंवा आठ-नऊ वर्षांपेक्षा अधिक काळाने हा 'लोकोत्सव' होत असल्याने आणि त्यात झालेल्या 'न भूतो' गदारोळामुळे तशी उसंतही मिळाली नाही. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड या काळात घडली. दीर्घप्रतीक्षित मनमाड-इंदूर रेल्वेमार्गावर प्रत्यक्ष रूळ टाकण्यास सुरुवात झाली आहे.

नुकतीच बहुचर्चित पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मार्ग बदलण्याची घोषणा करून केंद्राने प्रवाशांसह शेतकरी व उद्योजकांच्या स्वप्नांची एकप्रकारे वाटमारी केली. त्यामुळे संतापाची लाट निर्माण होऊन आंदोलने सुरू झाली आहेत. मात्र, या प्रकल्पाच्याच बरोबरीने साधारण तीन दशके रखडलेल्या मनमाड-इंदूर रेल्वेमार्गाच्या कामाचा श्रीगणेशा करून केंद्राने मोठा दिलासा दिला. गेल्या महिन्यातच सुरत-चेन्नई महामार्गाचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या एकोणीस हजार कोटींच्या सहापदरी हरितक्षेत्र रस्ते प्रकल्पाला मंजुरी देऊन केंद्राने महाराष्ट्राला नववर्षाची भेट दिली होतीच. पाठोपाठ प्रलंबित इंदूर रेल्वेला चाल देऊन दुसरा सुखद धक्का दिला. राजधानी मुंबई ते इंदूर हे अंतर अडीचशे किमीने, तर पुणे ते इंदूर अंतर तीनशे किमीने कमी करणारा हा प्रकल्प विकासाचा आयाम बदलणाराच आहे.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील पन्नासहून अधिक खासदार, अनेक मंत्री, संघर्ष समिती, शेतकरी, उद्योजक संघटना यांसह इतरही अनेक घटकांच्या पाठपुराव्यानंतर अठरा हजार कोटींचा हा रेल्वेमार्ग फळास येतो आहे. वास्तविक, अवघ्या हजार कोटी रुपयांत पूर्ण व्हावयाचा हा प्रकल्प दीर्घकाळ रखडल्याने त्यासाठी आज अठरा पट अधिक किंमत मोजावी लागत आहे. योजनांची रखडणूक व त्यानंतर हजारो कोटी रुपयांची उधळपट्टी हे समीकरणच बनले आहे. नाशकात सिंहस्थासाठी होऊ घातलेला सुमारे आठ हजार कोटी रुपयांचा प्रस्तावित बाह्य वळण रस्ता मागच्याच कुंभमेळ्यात हाती घेतला गेला असता, तर आज सहा-सात हजार कोटी रुपये वाचले असते. आज वाहतूक कोंडीसह इतर अडचणीही टळू शकल्या असत्या. असो. तरी 'देर आये, दुरुस्त आये' या न्यायाने या रेल्वे प्रकल्पाचे महत्त्व तसूभरही कमी होत नाही. तो तीन वर्षांतच साकारला जाईल.

खासकरून नाशिक, धुळे, जळगावसह मराठवाडा तसेच मध्य प्रदेशातील अनेक कृषीजिल्ह्यांसाठी ही रेल्वे स्वप्नांची पूर्ती करणारीच ठरेल. कृषीमाल व इतर उत्पादने दक्षिणेकडील महत्त्वांच्या राज्यांत पोचणे अधिक गतिमान होऊ शकेल. सध्या इंदूरला रस्त्याने जाण्यासाठी मुंबईहून बारा तास, तर नाशिकहून आठ तास खर्ची पडतात. आता रेल्वेने हेच अंतर अनुक्रमे सहा व तीन तासांपर्यंत घटणार असल्याने वेगवान संपर्क होऊन वेळ, पैसा, इंधन, मनुष्यबळ अशा साऱ्या साधनसंपत्तीची बचतच होईल. महत्त्वाचे म्हणजे, समृद्धी महामार्गाप्रमाणे हा मार्ग 'हाय फ्लाइट कॉरिडॉर' (जमिनीपासून उंचावर) असल्याने रेल्वे वेगाने धावू शकेल.

येत्या पाच-सात वर्षांत या प्रकल्पातून दीड लाख रोजगार उपलब्ध होण्याचे दावे रेल्वे मंत्रालयाने केलेले आहेत. या आकड्यांच्या सत्यासत्यात न पडता, या मार्गावरील चार लाख हेक्टर उजाड जमीन सेझसह इतर प्रकल्पांसाठी उपलब्ध होऊ शकणार असल्याने हेही नसे थोडके! आता तिन्ही सरकारांनी मिळून या मार्गावर पुरेशा रोजगार व व्यवसायसंधी मिळवून देणाऱ्या उद्योगांच्या उभारणीला प्राधान्य द्यायला हवे. अर्थात, अद्याप काही जिल्ह्यांत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे दिव्यही पार पाडावे लागेल. परंतु, 'नाशिक-पुणे रेल्वे'प्रमाणे किमान दोन पिढ्यांनी या रखडपट्टीतून धडा घेतलेला असल्याने फार आडकाठी येणार नाही असे दिसते.

## बिबट्याचा महिलेवर जीवघेणा हल्ला !



**दि.२१, बीड :** जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील रूपूर शिवारात बुधवारी सकाळी बिबट्याने एका महिलेवर जीवघेणा हल्ला केल्याची थरारक घटना घडली आहे. कपाशीच्या शेतात कापूस वेचणी करत असताना हा हल्ला झाला. सुदैवाने, आजूबाजूला असलेले शेतकरी मदतीला धावून आल्याने मोठा अनर्थ टळला असला तरी, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात दहशतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोळवाडी येथील रहिवासी असलेल्या विठाबाई शिवराम नेटके या रूपूर शिवारातील डोंगरपट्ट्यालगत असलेल्या आपल्या शेतात कापूस वेचणीचे काम करत होत्या. सकाळी कामात मग्न असताना, शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याच्या या हल्ल्यात विठाबाई गंभीर जखमी झाल्या. हल्ला होताच त्यांनी आरडाओरडा केला, ज्यामुळे जवळच असलेल्या शेतातील इतर शेतकरी आणि मजूर तातडीने त्यांच्या दिशेने धावले. नागरिकांचा वाढता आरडाओरडा आणि जमाव पाहून बिबट्याने तिथून पळ काढला. जखमी विठाबाईंना तातडीने शिरूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आले. तिथे प्राथमिक उपचार केल्यानंतर, जखमांचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांना पुढील उपचारासाठी बीडच्या जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे.

## ठाकरे जी..

बाळासाहेब ठाकरे
व्यक्तित्व अलौकिक
मराठी मातीस लाभे
अनमोल हे माणिक

मराठी माणसा प्रती
आंतरिक जवळीक
बाँम्बेची केली मुंबई
सुस्वभावीआगळीक

व्यंगचित्रा वाहिलेले
साप्ताहिक मार्मिक
वर्मावरतीशरसंधान
भगवा द्रष्टा धार्मिक

सामनापक्ष मुखपत्र
लढवैये सार्थ दैनिक
रक्षण करे समाजाचे
शब्दशस्त्रांचे सैनिक

कर्तृत्वाअन् वक्तृत्वा
छान जमे सोयरिक
स्वप्न आणा सत्यात
सुखी राहो नागरिक

अयोध्या मंदीर स्वप्न
तुष्ट कारसेवाश्रमिक
डगमगला ना निर्धार
हो स्थितीव्युत्क्रमिक

मंत्रमुग्ध करते चरित्रे
असे आगळे मांत्रिक
बेधडक जरी उत्साह
जाणे कायदे तांत्रिक

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शंकरराव चव्हाण विद्यालयात सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवाचा थाटात शुभारंभ



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** भारताच्या ७७ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून स्थानिक शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथे शालेय सांस्कृतिक महोत्सव व विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी शारीरिक शिक्षक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक विपीन शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.

सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे होत्या तर प्रम ुख पाहुणे म्हणून शंकरराव इंग्लिश शाळेच्या मुख्याध्यापिका मोनाली सुरकर, वरिष्ठ शिक्षक गणेश चिखले, प्रा.प्रविण साबळे, शिक्षिका गीता जालंदर, पुष्पा बढिये, मनिषा नखाते, प्रशिक्षक पियुष भोकरे, आदिल शेख, युग मडावी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका वीणा पांडे यांच्या हस्ते विपीन शर्मा व प्रशिक्षक पियुष भोकरे यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना विपीन शर्मा यांनी खेळाडूंचे कौतुक करत आयुष्यात खेळांचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, खेळ केवळ शारीरिक सुदृढतेसाठी नसून तो शिस्त, जिद्द आणि संयम शिकवतो. मैदानावरचा घाम भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ देतो. विद्यार्थ्यांनी हार-जित पेक्षा खेळातील सातत्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी अध्यक्षीय भाषणातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला त्या म्हणाल्या की, केवळ पुस्तकी ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हे आमचे ध्येय आहे सांस्कृतिक कार्यक्रम आणि खेळ यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्यात संघभावना निर्माण होते असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महोत्सवात वक्तृत्व, वेशभूषा, नृत्य, समूहगीत यांसह कबड्डी, खो-खो, लंगडी, कुस्ती, लांब उडी, उंच उडी आणि लिंबू-चमचा अशा विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व सहभागी खेळाडूंना 'खेळाडूवृत्तीची शपथ' देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन उमेश झाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिन कोरडे यांनी मानले हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## दापोली पंचायत समिती व जिल्हा परिषद उमेदवारांचे अर्ज दाखल

### गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे शक्तिप्रदर्शन




**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२१, दापोली (रत्नागिरी) :** पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांचे उमेदवारी अर्ज आज गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत दाखल करण्यात आले. दापोली तालुक्यातील सर्व उमेदवारांचे अर्ज शिवसेनेच्या वतीने आज अधिकृतपणे भरले गेले. यावेळी शिवसेनेचे तालुका, शहर व विभागातील पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दापोली तालुक्यामध्ये शिवसेना व युतीतील इतर पक्षांमध्ये जागावाटपाबाबत बिघाडी झाल्याने शिवसेनेने व आरपीआयने युती करून स्वतंत्रपणे सर्व जागांवर आपले उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आज दापोली प्रांत कार्यालयात उमेदवारी अर्ज सादर करण्यात आले. या निमित्ताने दापोली शहरातून भव्य अशी रॅली काढण्यात आली. घोषणाबाजी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करत रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून दापोलीतील देवस्थान पंचमुखी हनुमान मंदिर येथे दर्शन घेऊन त्यानंतर उमेदवारी अर्ज भरले गेले.

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नवी मुंबई येथे रस्ता सुरक्षा अभियान





**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२१, नेरूळ (नवी मुंबई) :** परिवहन कार्यालय (आरटीओ) नवी मुंबई व अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विध्यमाने खास वाहनधारकांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. या मागचे उद्दीष्ट एकच स्वत:ची काळजी घ्या, सुरक्षित रहा,या शिबीरात वाहनधारकांची, बीपी, शुगर, डोळे तपासणी, दातांची तपासणी ,ईसीजी इत्यादी चेकअप मोफत करण्यात आले. तसेच या शिबीरामागचा व रस्ता सुरक्षा अभियानामधला एक महत्वाचा उपक्रम म्हणजे रक्तदान. रक्तदान हेच सर्व श्रेष्ठदान हा संदेश ही या रस्ता सुरक्षा अभियानातून परिवहन कार्यालय नवी मुंबई यांच्याकडून देण्यात आला, आपले रक्तदान हेच हजारो निष्पाप नागरिकांना बलिदान देऊ शकते. त्याचबरोबर सडक सुरक्षा जिवन रक्षा या बद्दल ही मोटर वाहन निरिक्षक धीरज पवार यांनी वाहनधारकांना महत्व पटवून दिले.

या रस्ता सुरक्षा अभियानासाठी अपोलो हॉस्पिटल टिमचे मोलाचे सहकार्य लाभले. या अभियानात वाहन धारकांसह, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दत्तात्रेय सांगोलकर, सहा, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे, मोटर वाहन निरिक्षक,धीरज पवार, क्षीरसागर, चेतन देवरे, तुषार कदम, यांच्यासह वाहन चालक प्रतिनिधी संघटना अध्यक्ष राजेश भोईर, आरटीओ कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी व वाहन प्रतिनिधी यांनी आपल्या आरोग्याची तपासणी करुन मोठ्या प्रमाणात रक्तदान करुन या शिबीरास योगदान दिले.या शिबीरातील रक्तदात्यांना अपोलो हॉस्पिटल व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नवी मुंबई यांच्या प्रमाणपत्र देऊन त्यांच्या या रक्तदानरुपी योगदानाचा सन्मान करण्यात आला.

# विसापूरचे एसएनडीटी महाविद्यालय ठरणार नारी सक्षमीकरणाचे राष्ट्रीय मॉडेल

## आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** अत्याधुनिक सैनिक शाळा, मेडिकल कॉलेज, २८० कोटींचे कॅन्सर हॉस्पिटल, १०० बेडेड ईएसआयसी हॉस्पिटल, १५ कोटींचे स्मार्ट आयटीआय, क्रीडा स्टेडियम व बॉटनिकल गार्डन यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे हा भाग मॉडेल म्हणून विकसित होत आहे. या पार्श्वभूमीवर विसापुर (बल्लारपूर) येथील एसएनडीटी विद्यापीठ हे नारी सक्षमीकरण, नवोपक्रम आणि स्वावलंबनाचे राष्ट्रीय मॉडेल केंद्र बनेल, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. विसापुर (बल्लारपूर) येथील एसएनडीटी महाविद्यालयाच्या बांधकाम प्रगतीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.उज्वला चक्रदेव, प्र-कुलगुरू रुबी ओझा, कुलसचिव विलास नंदावडेकर, वित्त व लेखाधिकारी डॉ.विकास देसाई, संचालक डॉ.संजय नेरकर, डॉ.प्रभाकर चव्हाण, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.सुनील घाडगे, उपकुलसचिव बाळू राठोड, बल्लारपूरचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता सोनाली चव्हाण, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, संजोग मेंढे आदींची उपस्थिती होती.

आ.सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विद्यापीठाच्या कॅम्पसचे बांधकाम केवळ दर्जेदारच नव्हे तर नाविन्यपूर्ण, आधुनिक आणि 'मॉडेल कॅम्पस' म्हणून ओळख निर्माण करणारे असावे. जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचा समावेश करून शिक्षणव्यवस्था अधिक प्रभावी व विद्यार्थी-केंद्रित करावी, जेणेकरून हे इन्स्टिट्यूट आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करेल. विद्यापीठाचे वॉल कंपाऊंड मजबूत, सुरक्षित व आकर्षक असावे, तसेच परिसरातील अंतर्गत रस्ते उत्तम दर्जाचे असावेत. रस्त्यांवर रेडियम पट्टे लावून रात्रीच्या वेळी वाहतूक सुरक्षितता वाढवावी आणि दोन्ही बाजूंना गुलमोहर व विविध फुलझाडांची लागवड करून परिसर हरित, सुंदर व पर्यावरणपूरक बनवावा. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थिनींसाठी सुमारे ३०० क्षमतेचे अत्याधुनिक वसतिगृह इमारत उभे राहत असून, समाजकल्याण विभागाकडून वसतिगृहासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन मोठ्या क्षमतेचे, सुविधायुक्त होस्टेल उभारावे. यावेळी आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या सुरू असलेल्या बांधकामांचा दर्जा, वेळापत्रक आणि सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

**आरोग्य-शिक्षण-पर्यटन प्रकल्पांमुळे परिसर होणार मॉडेल झोन**

या परिसरात सैनिक शाळा, बॉटनिकल गार्डन, तालुका क्रीडा स्टेडियम तसेच ईएसआयसीचे १०० बेडेड अत्याधुनिक हॉस्पिटल उभे राहत आहे. याच परिसरात २८० कोटी रुपयांच्या निधीतून साकारलेल्या १४० बेडेड कॅन्सर हॉस्पिटलचे उद्घाटन सरसंघचालक मोहनजी भागवत या हस्ते नुकतेच पार पडले. विशेष म्हणजे या कॅन्सर हॉस्पिटलमध्ये देशातील पहिली हेलियम गॅसविरहित अत्याधुनिक मशीन कार्यान्वित करण्यात आली आहे. दरम्यान, मेडिकल कॉलेजचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, संपूर्ण महाराष्ट्रातील हेलिकॉप्टर ॲम्ब्युलन्स सेवेसाठी स्वतंत्र हेलिपॅड सुविधा असलेले हे एकमेव मेडिकल कॉलेज ठरणार आहे. तसेच ताडोबा पर्यटन विकासासाठी ३ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्याकडे सादर करण्यात आला असून, देशातील ५० प्रमुख पर्यटन केंद्रांमध्ये ताडोबाचा समावेश करण्याचा ठाम निर्धार करण्यात आला आहे.

# माघी गणेशोत्सव विसर्जनाकरिता नमुंमपा मार्फत सुविधा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. या पार्श्वभूमीवर मागील वर्षीप्रमाणेच महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने माघी गणेशोत्सवातील श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी नैसर्गिक पारंपारिक २२ विसर्जन स्थळांच्या जवळ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. नागरिकांनी आपल्या श्रीमूर्तींचे विसर्जन महानगरपालिकेने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये करावे असे आवाहन करण्यात येत आहे.अभियांत्रिकी विभागाच्या वतीने शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली २२ ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून त्यावर संबंधित विभाग कार्यालयांचे सहा.आयुक्त तथा विभाग



अधिकारी यांचे निरीक्षण व दोन्ही परिमंडळांचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व संजय शिंदे यांचे नियंत्रण असणार आहे.या विसर्जन स्थळांवर श्रीमूर्ती पूजन व निरोपाच्या आरतीसाठी टेबल-खुर्ची व्यवस्था, विद्युत व्यवस्था तसेच ध्वनीक्षेपक व्यवस्था असणार आहे. तसेच त्याठिकाणी ओले व सुके निर्माल्य टाकण्यासाठी निर्माल्य कलश व्यवस्था असणार आहे. त्याचप्रमाणे निर्माल्य वाहतुकीसाठी ही स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. या विसर्जन स्थळांवर स्वयंसेवक कार्यरत असणार असून अग्निशमन जवान ही सज्ज असणार आहेत. त्याचप्रमाणे आरोग्य पथके ही सज्ज असणार आहेत.माघी गणेशोत्सवाचा विसर्जन सोहळा ही उत्साहात आणि निर्विघ्नपणे पार पडावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक सर्व व्यवस्था करण्यात आलेली असून नागरिकांनी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने माघी गणेशोत्सवात प्रतिष्ठापना केलेल्या प्राधान्याने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीमूर्तींचे विसर्जन आपल्या नजिकच्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे तसेच शाडूच्या मूर्तींचेही विसर्जन पर्यावरणशील दृष्टीकोन जपत कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**श्री गणेशोत्सव नैसर्गिक विसर्जन स्थळांशेजारील कृत्रिम विसर्जन तलावांची स्थळे :**

बेलापूर : ०१) दारावे तलाव; ०२) करावे तलाव; ०३) आग्रोळी तलाव; ०४) बेलापूर तलाव; ०५) दिवाळे जेट्टी.

नेरूळ : ०१) चिंचोली तलाव, शिरवणे- जुईनगर; ०२) गणेश तलाव, सेक्टर १८, नेरुळ.

वाशी : ०१) जागृतेश्वर तलाव, सेक्टर ७, वाशी; ०२) जुहुगांव तलाव.

तुर्भे : ०१) तुर्भेगांव तलाव; ०२) कोपरीगांव तलाव; ०३) खोकड तलाव, सानपाडा एमआयडीसी.

कोपरखैरणे : ०१) सेक्टर १९ धारण तलाव; ०२) महापे तलाव.

घणसोली : ०१) राबाडा तलाव; ०२) छत्रपती शिवाजी महाराज तलाव, घणसोली; ०३) राजीव गांधी तलाव (खदाण तलाव), गोठिवली; ०४) गुणाली तलाव, घणसोली.

ऐरोली : ०१) ऐरोली नाका तलाव; ०२) ऐरोली, सेक्टर २०, खाडी तलाव; ०३) दिवागांव तलाव, ऐरोली.

दिघा : ०१) गणपती बाप्पा तलाव (खोकड तलाव), दिघा.

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा आंदोलनाचा तिसरा दिवस; मागण्या मान्य न झाल्यास 'लाल वादळ' रेल रोको करणार



**या लाँग मार्चद्वारे खालील प्रमुख मागण्या सरकारपुढे मांडण्यात आल्या आहेत :-**

वन हक्क अधिनियम आणि पेसा कायद्याची पूर्ण व प्रभावी अंमलबजावणी
देवस्थान, इनाम व सरकारी जमिनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या नावावर नोंद करणे
मनरेगा योजना पूर्ण क्षमतेने राबवणे व थकीत मजुरी तात्काळ देणे
स्मार्ट मीटर योजना रद्द करावी व वाढीव वीजबिलांवर तोडगा काढावा
वधावन व मुरबे बंदर प्रकल्पांसह आदिवासी हिताविरोधी प्रकल्प रद्द करावेत
कामगारविरोधी श्रम संहिता मागे घ्याव्यात

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, पालघर :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली आदिवासी, शेतकरी व कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी काढण्यात आलेला दोन दिवसांचा पायी लाँग मार्च पालघरमध्ये तीव्र टप्प्यावर पोहोचला असून आज तिसरा दिवस असून आंदोलन चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. आंदोलकांनी रेल रोकोचा इशारा दिल्यामुळे पालघर रेल्वे स्टेशन व पोलिस स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दोन दिवसांचा पायी लाँग मार्च माकपा च्या वतीने चारोटी (डहाणू तालुका) येथून सोमवारपासून सुरू झालेला पायी लाँग मार्च मंगळवारी पालघर येथे दाखल झाला. या मार्चमध्ये जवळपास ५० हजारांहून अधिक आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.लाल वादळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या लाँग मार्चदरम्यान विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. दोन दिवसांच्या सलग पायी प्रवासानंतर तिसऱ्या दिवशी आंदोलकांनी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. रात्री उशिरापर्यंत आंदोलन सुरूच होते. मात्र तिसऱ्या दिवशी ही पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने रेल रोकोच्या इशाऱ्याने तणाव

आंदोलकांच्या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास रेल रोको, रस्ता रोको आणि आंदोलन मुंबईपर्यंत नेण्याचा इशारा CPI(M) च्या नेत्यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर पालघर रेल्वे स्टेशन, स्टेशन परिसर, पोलिस स्टेशन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तिसऱ्या दिवशी सकाळपासून आमदार कॉ. विनोद निकोले सह अनेक माकपाचे नेते जिल्हाधिकारी इंदुमती जाखड यांच्या दालनात आपल्या मागण्यासाठी चर्चा करण्यास बैठक बोलवली आहे, मात्र संध्याकाळी पर्यंत तोडगा निघाला नसल्याने अजून आंदोलन आक्रमक होण्याची चिन्हे दिसत आहेत. या लाँग मार्चचे नेतृत्व CPI(M) चे ज्येष्ठ नेते व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.अशोक ढवळे तसेच मकपा आमदार विनोद निकोले यांनी केले. विविध आदिवासी संघटना, महिला संघटना सहभाग आंदोलनात पाहायला मिळत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या ठिय्या आंदोलनादरम्यान प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांकडून देण्यात आला आहे. दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी पर्यंत आंदोलन कर्त्यांच्या मागण्या वर ठोस निर्णय झाला नसल्याने आंदोलन कर्ते आक्रमक झाले आहेत.

मात्र जिल्हा प्रशासन आदिवासी शेतकरी, शेतमजूर यांच्या सामान्य मागण्या मान्य करत नाहीत, त्यातच ऐन हिवाळ्यात आंदोलनकर्त्यांना उघड्यावर रात्र काढावी लागत आहे. जिल्हा प्रशासनाने आंदोलन कर्त्यांची जीवाशी खेळ केला असून आंदोलनात जिल्ह्यातील अनेक काना कोपऱ्यातून वयोवृद्ध महिला, पुरुष सामील झाले आहेत.

